**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१४/२०१३**
**वादीतर्फे साक्षीदार क्र.१**
**निशाणी क्र.६९ पुढे सुरु**

**<u>प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश निशाणी क्र.७६ वरील दि.२१.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये रद्द करण्यात आला. सबब, आज दि.२८.०३.२०२३ रोजी प्रतीवादी प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेतर्फे विधीज्ञ श्री.डी.टी.पवार यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु</u>**

१२. वादी क्र.२ व ३ हे माझे चूलत भाऊ आहेत. आम्ही वेगळे राहतो. अशोकराव हे मुंबईला राहण्यास असतात. त्यांच्या घरातील सर्व मुंबईला राहतात. रतन मानसिंग शिंदे हे कधी गावात तर कधी मुंबईला राहतात. त्यांचे कुटुंबिय हे दर महिन्याला १५ दिवस गावी व १५ दिवस मुंबई येथे राहतात. रतनच्या वडीलांचे पूर्ण नाव मानसिंग वामनराव शिंदे असे आहे. रतनच्या भावाचे नाव प्रभाकर मानसिंग शिंदे असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे तथाकथित उतारे मी जोडलेले आहेत त्याला प्रभाकर मानसिंग शिंदे यांचे नाव आहे. प्रभाकर मानसिंग शिंदे यांच्या नावाबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही वादींनी दावा मिळकती या आमच्या मालकीच्या आहेत असा जाहीर ठराव करुन मागितला आहे.

प्रश्न – प्रभाकरच्या हिश्याचे काय झाले, त्याला मालकी हक्क आहे का ?

उत्तर – त्याला मालकी हक्क आहे.

प्रभाकरने दावा मिळकतीतील मालकी हक्क आजअखेर सोडलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रभाकरची मालकी आहे असे दाव्यामध्ये नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रभाकरच्या गैरहजेरीत दावा मिळकत ही आमच्या मालकीची आहे हे आम्ही ठरवून मागत आहे. अशोकराव यांच्या वडीलांचे पुर्ण नाव गुलाबराव श्रीपतराव शिंदे असे आहे. गुलाबराव यांना अशोकराव, राजकुमार व नंदकुमार अशी तीन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी अशोकराव यांचे दोन बंधू राजकुमार व नंदकुमार यांना दाव्यात सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गुलाबरावची मुले व मानसिंगची मुले यांच्यात वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अशोकराव व त्यांचा भावांचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा असताना आम्ही वादींनी फक्त आमच्या मालकीची मिळकत आहे असा दावा केलेला आहे.

मला एक बहिण आहे. तिचे नाव हेमलता प्रमोद पिसाळ असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण हेमलता, वादी क्र.२ अशोक व वादी क्र.३ रतन यांनी मला दाव्याचे कामकाज पाहण्यासाठी कुलमुखत्यार म्हणून नेमलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र.२ व ३ यांनी स्वतःसाठी दावा दाखल केलेला आहे. माझे वडील हे एकटेच होते, त्यांना कोणी भाऊ नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांचे नांव मारुती जयसिंग शिंदे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मारुती यांना श्रीपती नावाचा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्रीपतीच्या वडीलांचे नाव जयसिंग पांडुरंग शिंदे असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, जयसिंग यांना रघुनाथ, त्रिंबक व केशव असे तीन भाऊ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या चौघांचे वाटप झालेले नाही. त्या चौघांमध्ये लेखी वाटप झालेले आहे. त्या वाटपामध्ये तथाकथित दावा मिळकत ही जयसिंग शिंदे व रघुनाथ शिंदे यांच्या नावाला घातली. त्या वाटपाचा दस्त मला उपलब्ध नाही त्यामुळे मी तो दाखल करु शकत नाही. माझ्या जन्माच्या अगोदर जे दावे झाले त्याबद्दल मला माहिती आहे. मारुती, रघुनाथ, गुलाब, जयसिंग यांनी रे.दि.मु.नं.७१९/१९३८ हा दाखल केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा दिनकर रतनसिंग शिंदे यांच्याविरुध्द केला होता व तो दावा फेटाळला. वामन यास मानसिंगराव हा एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या खापर पंजोबांना देवराव नावाचा भाऊ होता. देवराव यांचा मुलगा भगवंतराव. भगवंतराव यांना मुलगा देवराव. हे म्हणणे खरे आहे की, देवराव भगवंतराव शिंदे यांचा मुलगा रामचंद्र देवराव शिंदे म्हणजे प्रतिवादी क्र.१ चे वडील. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र यांना परशुराम नावाचा एक भाऊ होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ उदयसिंग हा परशुरामचा मुलगा. हे म्हणणे खरे आहे की, रमेश, दिलीप, भास्कर, सतिश हे उदयसिंग यांचे चार भाऊ व शालन व शकुंतला या दोन बहिणी. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ याला भगवंतराव व विलासराव हे दोन भाऊ. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही वादी व प्रतिवादी हे मुळ पुरुषाची पुढील पिढी आहोत.

१३. प्रल्हादचे पूर्ण नाव प्रल्हाद मानसिंगराव शिंदे असे आहे. सदर प्रल्हाद मानसिंगराव शिंदे हे प्रतिवादी क्र.४ चे वडील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या कथित ७/१२ उताऱ्याला प्रल्हाद मानसिंगराव शिंदे यांच्या नावाची ८आणे हिश्यास नोंद झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती नोंद १९७७–७८ पासून आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती नोंद त्यांचा हक्क असल्यामुळे झालेली आहे. प्रल्हाद मानसिंग

शिंदे यांच्या नावाची पोकळ नोंद कमी करावी म्हणून आजपर्यंत आम्ही अर्ज केलेला नाही. प्रल्हादला दिपक, शिवाजी व संजय ही तीन मुले. हे म्हणणे खरे आहे की, दिपकला दाव्यात पक्षकार केलेले आहे परंतू शिवाजी व संजय यांना पक्षकार केलेले नाही.
प्रश्न – प्रल्हाद यांची नोंद पोकळीस्त आहे असे तुम्ही म्हणत असताना शिवाजी व संजय यांना दाव्यात पक्षकार म्हणून सामील न करण्याचे कारण काय ?
उत्तर – मिळकतीला फक्त दिपक व सुभद्रा म्हणजे दिपकची आई यांचे नाव आहे.
हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीला दिपकचे नाव लागलेले आहे हे दाखवण्यासाठी मी उतारा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीला दिपकचे नाव लागले म्हणून त्याला दाव्यात पक्षकार केले हे मी खोटे सांगत आहे. दिपकचे नाव लागल्याचा फेरफार प्राप्त नसल्यामुळे मी तो उतारा दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दिपकशी व त्याच्या आईशी संगनमत करुन मी हा खोटा दावा आणलेला आहे.

**विधीज्ञांच्या निशाणी क्र.८० वरील विनंती अर्जावरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा — आर.बी.खवले,

**दिनांक** : २८.०३.२०२३ — **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.**

**<u>प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेतर्फे विधीज्ञ श्री.डी.टी.पवार यांचेमार्फत आज दि.२६.०४.२०२३ रोजी पुढील उलटतपास शपथेवर सुरु</u>**

१४. प्रभाकर यास दाव्यात पक्षकार करणे राहून गेलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, १९५८ साली आमची ग्रामपंचायत स्थापन झाली. आमच्या गावातील घर जागा व मोकळया जागेंच्या नोंदी १९५८ पासून झालेल्या आहेत. कथित दावा मिळकत ही १९५८

साली मारुती जयसिंग शिंदे, गुलाबराव श्रीपतराव शिंदे, वामन रघुनाथराव शिंदे यांच्या नावे नोंदवलेली होती. त्यावेळी दावा मिळकतीचा ग्रामपंचायत क्रमांक हा तिघांच्या नावे ६९, ७०, ७१ असा होता. ग्रामपंचायत मिळकत क्र.७० ही मारुती जयसिंग शिंदे यांच्या नावाने नोंद होती. दावा मिळकत ७० ही मारुती जयसिंगराव शिंदे यांच्या एकटयाच्या नावे नोंदली होती याबाबत मी उतारा दाखल केला नाही.

प्रश्न – ग्रामपंचायत मिळकत क्र.७० ही मारुती जयसिंग शिंदे व रामचंद्र देवराव शिंदे यांच्या नावे नोंदवलेली होती ?

उत्तर – त्याबाबत मला माहिती नाही.

आता मला ग्रामपंचायत मिळकत क्र.७० सन १९५८–५९ ते १९६२–६३ च्या रजिस्टरच्या उताऱ्याची प्रमाणित नक्कल दाखवण्यात आली. त्यामध्ये ग्रामपंचायत मिळकत क्र.७० ही मारुती जयसिंग शिंदे व रामचंद्र देवराव शिंदे यांच्या नांवे नोंद दिसते. सदर कागद हा उलटतपासामध्ये दाखवल्यामुळे व तो त्यांनी मान्य केल्यामुळे सदरील **उताऱ्याचे प्रमाणित प्रतीस निशाणी क्र.८३** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळीपासून फक्त घर मिळकतींची कराची आकारणी केली जात होती, खुल्या जागेंची नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत ही मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीला परडयाची जागा म्हणून ओळखले जाते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा कर भरल्याची एकही पावती दाखल केलेली नाही. आता मला मी दाखल केलेले कागदपत्रे दाखवण्यात आले, तसेच मी दाव्याची पाहणी केली असता दावा मिळकतीच्या कर भरल्याच्या पावत्या आजपर्यंत दाखल केलेल्या दिसून येत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, तशा पावत्या माझ्याकडे नसल्यामुळे मी त्या दाखल केल्या नाहीत. माझ्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीच्या कराच्या पावत्या तिघांनी वेगवेगळया भरलेल्या आहेत. दावा मिळकतीला किती कर आला ते सांगता येणार नाही. दावा मिळकतीचा कर किती भरतो ते सांगता येणार नाही.

१५. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही आमच्या वडीलोपार्जित मिळकतीच्या अतिदक्षिण बाजूची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या दक्षिण बाजूला गट नं.१२९ नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो नंबर जगन्नाथ आप्पासाहेब शिंदे व उत्तम आप्पासाहेब शिंदे यांच्या मालकीचा आहे.

प्रश्न – दावा मिळकत व दक्षिणेकडील गट नं.१२९ या दोन्हीमधून पूर्व पश्चिम असा बौध्दवस्तीकडे जाणारा डांबरी रस्ता आहे ?

उत्तर – तो आता केलेला आहे.

सदरचा रस्ता हा गट नं.१२९ मधून जातो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या पूर्व बाजूला गट नं.१ आहे. गट नं.१ च्या पश्चिम बाजूला रस्ता आहे हे दाखवण्याकरीता मी कागद दाखल केलेला नाही. आता मला निशाणी क्र.८२ वरील अ.क्र.१ वर दाखल केलेले तीन फोटो दाखवण्यात आले. ते फोटो दावा मिळकतीचे आहेत. ते फोटो सध्याच्या वस्तुस्थितीप्रमाणे आहेत. सदरचे फोटो हे उलटतपासामध्ये दाखवल्यामुळे व साक्षीदाराने मान्य केल्यामुळे सदरील **तीन फोटोंना एकत्रितपणे निशाणी क्र.८४** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर फोटोमध्ये जे गवत वाढलेले दिसत आहे त्या फोटोमध्ये गोबर गॅस व संडास आहे व ते बंद स्थितीत आहे. दावा मिळकतीमध्ये जी ट्रॅक्टरची अवजारे दिसत आहेत ती कोणाची आहेत ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा, रतनचा व अशोक गुलाबचा स्वतःचा ट्रॅक्टर नाही. आता मला निशाणी क्र.८२ वरील अ.क्र.२/१ वरील फोटो दाखवण्यात आला. तो दावा मिळकतीचा सध्याचा फोटो आहे. आता मला निशाणी क्र.८२ वरील अ.क्र.२/३ वरील फोटो दाखवण्यात आला. तो फोटो स.नं.१ चा फोटो असून त्यामध्ये प्रतिवादींची जनावरे वगैरे बांधल्याचे दिसत आहे. सदरील दोन्ही फोटो मान्य केल्यामुळे सदरील **फोटोंना अनुक्रमे निशाणी क्र.८५ व ८६** देण्यात येत आहे.

प्रश्न – प्रतिवादी यांच्याकडे ट्रॅक्टर, टेम्पो वाहने आहेत ?

उत्तर – त्याबाबत मला काही माहिती नाही.

हे म्हणणे खरे आहे की, आमची वडीलोपार्जित जमीन दक्षिण बाजूच्या स.नं.१२९ पासून सुरु होते ते उत्तरेकडे देवराव शिंदे यांच्या घरापर्यंत उत्तर दक्षिण अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमची वडीलार्जित उत्तर दक्षिण संपूर्ण मिळकत ही गावठाणातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर दक्षिण उत्तर वडीलोपार्जित मिळकतीमध्ये आमची जूनी घरे उत्तर बाजूस होती. हे म्हणणे खरे आहे की, दक्षिण बाजूकडची जागा ही परडयाची जागा म्हणून वापरली जायची. हे म्हणणे खरे आहे की, सदर वडीलार्जित मिळकतीचे आमच्या पूर्वजांमध्ये वाटप झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटपामध्ये सदर दक्षिण उत्तर वडीलार्जित मिळकतीमध्ये अतिउत्तर बाजूस देवराव शिंदे यांना घर बांधण्यास जागा दिली. हे म्हणणे खरे आहे की, देवराव शिंदे यांच्या दक्षिणेला पांडोबा यांना घर बांधण्यास जागा

दिली. हे म्हणणे खरे आहे की, पांडोबा यांच्या दक्षिणेला गंगाराम व गोपाल यांना घर बांधण्यासाठी जागा दिली. हे म्हणणे खरे आहे की, गंगाराम व गोपाल यांच्या दक्षिण बाजूला शिवाजी यांना जागा दिली. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे देवराव, शिवाजी, गंगाराम, पांडोबा, गोपाल यांना वाटून दिलेल्या जागेमध्ये त्यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजीच्या घराच्या दक्षिणेला असणारी परडयाची खुली जागा ही पांडोबा व देवराव यांच्यात सामाईकात खुली ठेवली होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या उत्तरेची मिळकत ही मानसिंग गणपतराव शिंदे यांची खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे की, मानसिंग गणपतराव शिंदे यांनी खरेदी केलेली मिळकत ही त्रिंबकचा मुलगा हरीबा याच्या मुलीकडून खरेदी केलेली होती. हरीबाच्या मुलीचे नाव पार्वती मानसिंग महामुलकर असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मानसिंग याने १७.०६.१९६८ रोजी पार्वती महामुलकर हिच्याकडून जागा खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे की, मानसिंगने खरेदी केलेली जागा ही दावा मिळकतीच्या उत्तरेस आहे. रतन व प्रभाकर यांचा गोबरगॅस ३० वर्षांपूर्वी बांधला असेल. सदरचा गोबरगॅस हा सन १९९१ साली बांधला असे म्हणले तर बरोबर ठरेल. रतनच्या वडीलांचे नांव मानसिंगराव वामनराव शिंदे. मानसिंग वामनराव शिंदे यांनी १० X १० अशी खुली जागा प्रतिवादीचे वडील रामचंद्र देवराव शिंदे यांच्याकडून कराराने घेतली होती का हे मला माहित नाही. तो करार ५ वर्षासाठी जागा देण्याचा होता का याची मला माहिती नाही. ५ वर्षानंतर मानसिंग वामन शिंदे यांनी ती जागा ज्याची होती त्याला सोडून दिली का हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर १० X १० ची जागा ही वापरात नाही. तेथे फक्त शौचालयाचा वापर होतो. दावा मिळकतीस चौघांच्या नावाची नोंद अंदाजे १९७७ दरम्यान झाली असेल परंतू नक्की सांगता येणार नाही. ती नांवे लावण्याबाबत ठराव झाल्याचे मला माहिती नाही. दावा मिळकतीला चौघांची नांवे ही वारसाने लागली. वामनरावच्या पश्चात मानसिंग यांचे नाव लागले, मारुतीच्या पश्चात सदाशिव यांचे नांव लागले व गुलाब श्रीपती आहे तसेच राहिले. मानसिंग, सदाशिव व गुलाबराव यांच्या नावाची नोंद होण्याअगोदरचे उतारे दाखल करण्यास मी तयार आहे. दावा मिळकतीला आजपर्यंत कोणकोणते ग्रामपंचायत मिळकत क्रमांक पडले हे आता मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीला पूर्वी जे ग्रामपंचायत मिळकत क्रमांक होते ते दाव्यात नमूद केलेले नाहीत. दावा दाखल करताना दावा मिळकतीचे जूने मिळकत क्रमांकाची माहिती वकिलांना दिली होती. तसेच, जून्या नंबरचे ८अ चे उतारे दिलेले होते का ते माझ्या लक्षात नाही. दावा मिळकतीचे जूने नंबर दाव्यात नमूद नाही ही बाब दावा वाचल्यानंतर

माझ्या लक्षात आलेली आहे. दावा वाचल्यानंतर दावा मिळकतीचे जून नंबर दाव्यात नमूद नसल्याबाबत वकिलांकडे मी हरकत घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे जूने नंबर मला माहित नाहीत. १९५८ ते १९७७ पर्यंत दावा मिळकतीला ग्रामपंचायत मिळकत क्र.६९, ७०, ७१ असे होते. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही ग्रामपंचायत मिळकतीला नोंद करायची झाल्यास ग्रामपंचायतीला सभा होते व बॉडीची बैठक होवून तसा ठराव होतो.

प्रश्न – १९७७–७८ ला प्रल्हाद मानसिंग शिंदे, मानसिंग वामनराव शिंदे, गुलाबराव श्रीपतराव शिंदे व सदाशिव मारुती शिंदे यांच्या नावाची नोंद झाल्याबाबत कोणताही ठराव नाही ?

उत्तर – त्याबाबत मला काही माहिती नाही.

वारस म्हणून मुळ मालकाचे नाव कंसात घेवून वारसांची नांवांची नोंद केली जाते का ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या नोंदी लागल्या आहेत त्या वारसहक्काने लागलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीला वारसाने नोंदी लागल्या हे दाखवणारा ठराव व फेरफार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही आमच्या मालकीच्या आहेत हे मी आमच्या नावाची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला झाल्यामुळे म्हणत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोंदीशिवाय दावा मिळकतीची मालकी दाखवणारा पुरावा तोंडी अथवा लेखी माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले उतारे हे दावा मिळकतीचे लागू उतारे नाहीत. १९७७–७८ ते २०१३ पर्यंत दावा मिळकतीस कोणते नंबर होते हे आता मी सांगू शकत नाही, त्याचे पुरावे मी दाखल केलेले आहेत. वामन रघुनाथ, मारुती जयसिंग व गुलाब श्रीपती हे आमचे पूर्वज. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या पूर्वजांनी दिनकर रतनसिंग शिंदे यांच्याविरुध्द ७१९/१९३८ हा दावा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा दावा हा रतनच्या मुलाने अतिक्रमण केले त्या अनुषंगाने दावा होता व तो दावा घर मिळकतीचे वाटप झाले त्या दरम्यानचा होता. हे म्हणणे खरे आहे की, तो दावा वाई कोर्टाने फेटाळला. देवराव शिंदे, पांडोबा, गंगाराम व गोपाल व शिवाजी यांच्यामध्ये जे लेखी वाटप झालेले होते त्याचा दस्त त्या दाव्यामध्ये दाखल केला होता का याची मला माहिती नाही. त्या वाटपात पांडूरंग व देवराव यांच्यामध्ये खुली जागा सोडली याबाबत मला माहिती नाही.

१६.		प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा पूर्वज हा देवराव सावजी शिंदे आहे. हे म्हणणे खरे आहे की, देवराव यांना भगवंतराव नावाचा एक मुलगा. हे म्हणणे खरे आहे की, भगवंतराव यांना देवराव म्हणजेच त्याच्या आजोबाचे नाव ठेवलेला मुलगा झाला. हे म्हणणे खरे आहे की, देवरावर भगवंतराव शिंदे यांना रामचंद्र नावाचा मुलगा होता. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र देवराव शिंदे याचा मुलगा प्रतिवादी क्र.१ लालासो आहे. हे म्हणणे खरे आहे की, लालासोचा मुलगा प्रतिवादी क्र.२ किरण. रामचंद्र देवराव शिंदे याला परशुराम नावाचा भाऊ. परशुराम देवराव शिंदे यांना ५ मुलगे व २ मुली. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी प्रतिवादी क्र.३ उदयसिंह हा परशुरामचा मुलगा. देवरावने दावा मिळकत क्र.७० ला त्याचे नाव लागल्यानंतर ती कोणाला विकल्याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्हा वादींचा पूर्वज पांडोबा हे आहेत. पांडोबाला जयसिंग, रघुनाथ, त्रिंबक व केशव ही चार मुले. हे म्हणणे खरे आहे की, त्रिंबकला रामा व हरीबा अशी दोन मुले. हरीबाची मुलगी पार्वती महामुलकर. हे म्हणणे खरे आहे की, जयसिंग यांना श्रीपती व मारुती ही मुले. मारुतीला सदाशिव नावाचा एक मुलगा ते माझे वडील. श्रीपती यांना गुलाबराव हा मुलगा. गुलाबराव यांना तीन मुले. त्यांची नावे अशोक, राजकुमार व नंदकुमार अशी. पांडोबा व देवराव यांच्यामध्ये जी परडयाची जागा होती त्याबाबत त्यांच्यामध्ये अथवा त्यांच्या वारसामध्ये वाटप झाले का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही आमच्या तिघांच्या मालकीची नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत आमचा कब्जा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या ताब्यात व त्यांच्या वहिवाटीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ पोकळीस्त नोंदीच्या आधारे दावा मिळकती आमच्या मालकीच्या आहेत असे समजून खोटा दावा दाखल केलेला आहे.

१७.		हे म्हणणे खरे आहे की, १६.०१.२०१३ रोजी झालेल्या तथाकथित वादासंदर्भात मी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केल्याचा पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.२७.०१.२०१३ रोजी दावा मिळकतीतील शेवग्याची झाडे, आंब्याची झाडे, चिकूची झाडे जाळून टाकल्याबाबत तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि.१६.०१.२०१३ व दि.२७.०१.२०१३ याव्यतिरिक्त कधीही वाद झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ०५.०२.२०१३ रोजी दिलेल्या तक्रारीमधील नमूद घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, १६.०१.२०१३ व २७.०१.२०१३ रोजीच्या

घटनेच्यावेळी वादी क्र.३ ची आई व माझे वडील म्हणजे मूळ वादी क्र.१ हे हजर होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यास खोटे कारण नमूद करण्यासाठी मी खोटा जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यास कोणतेही कारण घडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे मी दाखल केलेले उतारे खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दाखल केलेले तथाकथित उतारे हे दावा मिळकतीचे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, केवळ जागा पदरात पडावी म्हणून मी हा खोटा दावा दाखल केलेला आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Sd/-

**ठिकाण** : मेढा

**दिनांक** : २६.०४.२०२३

रविंद्र भ. खवले,

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मेढा.**